परिपत्रक क्र. ३७

रयत शिक्षण संस्था, सातारा.
जमीन विभाग,
दि. ०१/१०/२०१९.

सर्व शाखाप्रमुख,
रयत शिक्षण संस्था,

यांना---

विषय :- संस्था मालकीच्या जमीन/शेतीबाबत.

रयत शिक्षण संस्थेच्या कार्यविस्तार महाराष्ट्रातील १५ व कर्नाटकातील १ अशा १६ जिल्ह्यात कार्यरत आहे. संस्थेने शैक्षणिक कार्य करीत असताना शंभर वर्षे पूर्ण केली आहेत. संस्थेची अनेक ठिकाणी करण्यालायक शेती असून, तेथे कमवा आणि शिका योजनेमार्फत किंवा शाखेमार्फत शेती केली जाते.

अनेक ठिकाणी शाखा परस्पर, अनाधिकाराने संस्था मालकीची शाखेची शेती स्थानिक शेतकरी यांना भाड्याने/वाट्याने/खंडाने/खोतीने/कराराने देतात ही बाब चूकीची आहे. संस्थेच्या सदर शेतीचे किंवा शेती शाखांच्या जमिनीचे नियमन/देखरेख व मार्गदर्शन करणेसाठी संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलने दि. २५/०५/२०१७ रोजीचे बैठकीतील ठराव क्र. १२ ने शेती कमिटी नियुक्त केली आहे.

संस्थेने नियुक्त केलेल्या शेती कमिटीच्या दि. २२/०२/२०१८ रोजीच्या बैठकीत संस्था मालकीच्या शेतीबाबत भविष्यकाळात कायदेशीर अडचणी निर्माण होवू नये म्हणून स्थानिक शेतकरी/ग्रामस्थ/संस्था/ट्रस्ट व तत्सम हितसंबंधितास भाड्याने/वाट्याने/खोतीने/खंडाने/कराराने किंवा अन्य प्रकारे देवू नये अशा प्रकारचा ठराव क्र. ६ केला आहे. **सोबत ठरावाची प्रत जोडली आहे.**

वरीलप्रमाणे संस्था मालकीची शाखेची जमीन/शेती संस्था परवानगी/मंजूरी न घेता परस्पर भाड्याने/वाट्याने/खोतीने/खंडाने/कराराने किंवा अन्य प्रकारे दिल्यास संबंधित शाखाप्रमुख व विभागीय अधिकारी यांना जबाबदार धरुन पुढील योग्य ती कारवाई केली जाईल, यांची नोंद घ्यावी.

सोबत :- शेती कमिटी ठराव

सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१) सहसचिव (उच्च शिक्षण/माध्यमिक) रयत शिक्षण संस्था, सातारा.
२) ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.
३) सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था
४) को-ऑर्डिनेटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.

G:\New Folder\Vishal\Property pariptrak/ Sheti Pariptrak Oct 2019

'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' -कर्मवीर

सातारा 1919-2019
शताब्दी महोत्सव

# रयत शिक्षण संस्था, सातारा

संस्थापक-पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील, डी.लिट.

Fax No : (02162) - 231424
STD No. (02162)
234566,233857,232444,
228566, 234857

Website : www.rayatshikshan.edu E-mail :secretary@rayatshikshan.edu

जावक नंबर :
दिनांक :

**रयत शिक्षण संस्थेच्या शेती कमिटीच्या दि.२२/०२/२०१८ रोजी भरलेल्या बैठकीतील ठराव क्र.०६ (लागू पुरता उतारा )-**

**ठराव क्र.०६ (लागू पुरता उतारा )-**

**विषय :- संस्था मालकीची जागा / शेती भाड्याने / खंडाने / खोतीने / करार / वाट्याने देणेबाबत शाखाप्रमुखांकडून आलेल्या पत्रांवर विचार करणे.**

ठराव :- संस्थेच्या गांधीटेकडी, अकोला वासूद, वांगी नं.३, रिधोरे, भवानीनगर या शाखांनी संस्था मालकीची जमीन भाड्याने / खंडाने / खोतीने / करार / वाट्याने करुन देणेबाबत विनंती केली आहे. सदर शाखांनी केलेली विनंती अमान्य करण्यात येत आहे. तसेच संस्थेच्या सर्व शाखांनी संस्था मालकीची जागा / शेती शाखाप्रमुखांनी संस्था पूर्व-परवानगी न घेता परस्पर कोणासही द्यावयाची नाही. तसे आढळल्यास शाखाप्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल .

**सर्वानुमते मंजूर**

**खरी नक्कल**

**सचिव,**
**रयत शिक्षण संस्था,सातारा**